# प्रेस नोट

दिनांक १८.०२.२०२२

**आरोपी लोकसेवक तुकाराम पुंडलीक नरवटे, वय २७ वर्ष, पद– स्थापत्य अभियंत्रीकी सहायक(इंजिनीयर– घरकुल विभाग),( वर्ग ३), नेमणुक – पंचायत समिति कार्यालय देवणी ता. देवणी, जि. लातुर यांनी लाचेची मागणी करून लाचेची रक्कम स्वत: स्विकारली म्हणुन गुन्हा दाखल.**

यातील तक्रारदार यांना त्यांच्या वडीलांच्या नावे असलेल्या रमाई घरकुल आवास योजने अंतर्गत प्राप्त घरकुलाचा शेवटचा हप्ता वडीलांच्या नावे बॅकेत जमा करण्यासाठी तक्रारदारास १०००० /– रू लाचेची मागणी केलेबाबताची तक्रार दि. १७.०२.२०२२ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातुर या कार्यालयाकडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातुर यांच्या कडुन दि. १८.०२.२०२२ रोजी पंचासमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता तक्रारदार यांना त्यांच्या वडीलांच्या नावे असलेल्या रमाई घरकुल आवास योजने अंतर्गत प्राप्त घरकुलाचा शेवटचा हप्ता वडीलांच्या नावे बॅकेत जमा करण्यासाठी आरोपी लोकसेवक तुकाराम पुडलीक नरवटे, पद– स्थापत्य अभियंत्रीकी सहायक यांनी तक्रारदार यांचे कडे पंचासमक्ष सुरूवातीला १०,०००/– रूपयेची लाचेची मागणी करून तडजोडीअंती ९०००/– रूपये लाचेची मागणी केल्याचे लाच पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले.

तक्रारदार हे दि. १८.०२.२०२२ रोजी सदर लाचेची रक्कम ९,००० /– रू देण्याकरीता आरोपी लोकसेवक तुकाराम पुडलीक नरवटे, पद– स्थापत्य अभियंत्रीकी सहायक यांचेकडे पंचायत समिती कार्यालय, देवणी येथे गेले असता आलोपी लोकसेवक तुकाराम नरवटे यांनी ९०००/– रूपये लाच पंचायत समिती देवणी येथील त्यांच्या घरकुल विभाग या कार्यालयात पंचासमक्ष स्वत: स्विकारली.

म्हणून तक्रारदार यांचे फिर्यादीवरून आरोपी लोकसेवक यांचे विरूध्द पोलीस स्टेशन देवणी जि. लातुर येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे.

गुन्हयाचा तपास पोलीस उप अधीक्षक पंडीत रेजितवाड, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातुर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही डॉ राहुल खाडे, पोलीस अधिक्षक ,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद परिक्षेत्र औरंगाबाद, अतिरीक्त कार्यभार पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र नांदेड, धरमसिंग चव्हण, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक पंडीत रेजितवाड, सपोउपनि/संजय पस्तापुरे, पोह/रमाकांत चाटे, भागवत कठारे, फारूख दामटे, पोना/संतोषकुमार गिरी, मपोना/शिवकांता शेळके, पोका/शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, मंगेश कोंडरे, मपोका/रूपाली भोसले, पोका/ गजानन जाधव, चापोना/राजु महाजन यांनी पार पाडली.

तरी सर्व नागरीकांना अहवान करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्याचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| १ | धरमसिंग चव्हण, अपर पोलीस अधीक्षक | ९९२३४१७०७६ |
| २ | पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधीक्षक | ९३०९३४८१८४ |
| ३ | टोल फ्रि हेल्प लाईन क्रमांक | १०६४ |
| ४ | कार्यालयाचा फोन क्रमांक | ०२३८२२४२६७४ |
| ५ | कार्यालयाचा ई मेल आयडी | dyspacblatur@gmail.com |
| ६ | वेब साईट | www.acbmaharashtra.gov.in |
| ७ | मोबाईल ॲप | www.acbmaharashtra.net |
| ८ | फेसबुक पेज | www-facebook.com/maharashtraACB |

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातुर

Scanned with CamScanner